आजचे कार्यक्रम

शिवपुत्र संभाजी महानाट्य
सकाळी ९ वा. मोदी मैदान, तपोवन, पंचवटी, नाशिक

सावानात वाङ्मयीन पुरस्कार
सायं. ६ वा. मु.शं. औरंगाबादकर सभागृह, नाशिक

पृथ्वीवरील विविध संपदा हीच खरी संपत्ती : डॉ. पाटील

नाशिक । वसुंधरा दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून पृथ्वीवरील जीवनाच्या शाश्वततेसाठी आपली जबाबदारी समजून घेण्याचा आणि कृतिशील होण्याचा दिवस आहे. पृथ्वीवरील निसर्ग, जैवविविधता, वनसंपदा, जलसंपदा हीच खरी संपत्ती असून, हवामान बदल, जंगलतोड, जलप्रदूषण, प्लास्टिकचा सुळसुळाट यावर मात करण्यासाठी सर्वांनीच आपापल्या पातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन हिरे महाविद्यालयातील भूगोल विभागप्रमुख डॉ. राकेश पाटील यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयातील भूगोल विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने वसुंधरा दिनानिमित्त 'आपली शक्ती, आपला ग्रह' या थिमवर आधारित कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. डॉ. पाटील हे मविप्रचे सभासद आणि केटीएचएम महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत.

केटीएचएमचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. प्रारंभी भूगोल विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी प्रास्ताविक व स्वागतपर भाषण केले. पर्यावरण संवर्धनासाठी केवळ चर्चा न करता कृती करणे गरजेचे आहे. प्रेरणादायी विचारांनी त्यांनी विद्यार्थ्यांना जागरूक आणि प्रेरित केले. अध्यक्षस्थानी प्रा. पी. व्ही. जाधव होते. अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले, सतत वाढणारी लोकसंख्या, शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे पर्यावरणाचे संतुलन ढासळत असून, याचे परिणाम केवळ नैसर्गिक आपत्तींमध्ये नाही तर मानवी आरोग्यावरही दिसून येत आहेत, असे विचार मांडले. माधुरी जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. राजेंद्र गुंजाळ यांनी आभार मानले. कार्यक्रमास दिंडोरीतील आनंद ॲग्रोचे गणेश घुगे, भूगोल विभागाचे प्रा. डॉ. राजेंद्र गुंजाळ, डॉ. सतीश हांडगे, प्रा. विलास लवंड, कविता नवले, चारुशिला निकम, गणेश खांदवे, भूगोल विभागाचे माजी विद्यार्थी उपस्थित होते.

सपकाळ महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी मेळावा

नाशिक । अंजनेरी येथील कल्याणी चॅरिटेबल ट्रस्ट संचलित रविंद्र गंभीरराव सपकाळ कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात 'माजी विद्यार्थी मेळावा २०२५' उत्साहात साजरा करण्यात आला.

सुरुवातीला संस्था अध्यक्ष डॉ. रविंद्र सपकाळ, उपाध्यक्षा कल्याणी सपकाळ, महाविद्यालय ॲल्युमिनी असोसिएशनचे सचिव पुरुषोत्तम माळोदे, कोमल साबळे, प्रा. मयूर सावंत, आकाश पिंगळे, योगेश वाघ, प्राचार्य डॉ. आर. एस. बच्छाव, प्रशासकिय अधिकारी डॉ. एस. एस. हारक व उपप्राचार्य प्रा. एस. बी. गोंदकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमास ७५ हून अधिक माजी विद्यार्थ्यांनी गत आठवणींना उजाळा देत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याप्रसंगी डॉ. के. आर. जाधव, सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. प्रा. प्राजक्ता बेटे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. सुजीत जाधव व प्रा. वनश्री नवाळे यांनी केले.

पंडित डॉ. तपन यांची नियुक्ती

नाशिक । शाक्त उपासक पंडित डॉ. तपन गुरुजी यांची अखिल भारतीय संत समिती, धर्म समाज, नाशिकच्या धार्मिक कक्षाचे प्रमुख समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष महंत डॉ. अनिकेतशास्त्री देशपांडे महाराज यांनी ही नियुक्ती केली.

'पीअँडजी'चा ट्वेंटी टेल्स ऑफ ट्रायम्फ प्रकाशित

मुंबई । प्रॉक्टर अँड गॅम्बल इंडिया या कंपनीचा प्रमुख कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व कार्यक्रम असलेल्या पीअँडजी शिक्षाने यंदा एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. शिक्षणाच्या माध्यमातून आयुष्य बदलविणाऱ्या २० वर्षीय योगदानाचा उत्सव 'पीअँडजी' साजरा करत आहे. गेल्या दोन दशकांमध्ये, या कार्यक्रमाने देशातील दुर्लक्षित समुदायांमध्ये शिक्षण उपलब्ध करून देऊन आणि शिकण्याच्या संधी सुधारून ५० लाखांहून अधिक मुलांचे जीवन सकारात्मक पद्धतीने बदलले आहे. या प्रवासाचा सन्मान करण्यासाठी, पीअँडजी ने ट्वेंटी टेल्स ऑफ ट्रायम्फ नावाचे कॉफी टेबल बुक सादर केले आहे. शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक मुलाला विकासाची संधी दिल्यास काय बदल घडू शकतो, याचे हे उदाहरणआहे

गोदामृत पतसंस्थेचा १२ टक्के लाभांश

नाशिक । गोदामृत संस्थेला या आर्थिक वर्षात ५२ लाख नफा झाला असून, ठेवीमध्ये वाढ झाल्याची माहिती अध्यक्ष प्रमोद पाटील यांनी दिली.

संस्थेच्या ठेवी २६ कोटी ४५ लाख, कर्ज वाटप २० कोटी ८५ लाख, स्वनिधी ३ कोटी २८ लाख, भागभांडवल १ कोटी १७ लाख, तर खेळते भांडवल ३३ कोटी २५ लाख रुपये आहे. संस्थेचा वार्षिक टर्न ओवर रक्कम रु.१२६ कोटी २४ लाख २१ हजार इतका आहे. त्याचबरोबर संस्थेने नेट एनपीए ०% करण्यात यश संपादन केले. संस्था सातत्याने सभासदांना १२% लाभांश वाटप करीत आहे. ग्राहक हिताच्या दृष्टीने विविध प्रकारच्या ठेव योजना, तारण कर्ज, गृह कर्ज, सोने तारण कर्ज कमीत कमी वेळेत अदा केले जात असल्याचे पाटील यांनी सांगितले.

वसुंधरा दिनानिमित्त विविध ठिकाणी कार्यक्रम

नाशिक । सिड़को महाराणा प्रताप चौक श्री वर्धमान स्थानक संघ, जैन महासंघ व नाशिक जिल्हा योग समिती नाशिक व महिला पतंजली समिती यांच्या संयुक्त विद्यमाने जैनस्थानक राणाप्रताप चौक सिड़को येथे योग व प्राणायम शिबिरात जागतिक वसुंधरा दिन साजरा-योग शिक्षक रामनाथ गंभीरे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला.

यावेळी बाळासाहेब शेळके, सुभाष वाणी, पांडुरंग बड़गुजर, राजेंद्र हिरे, पुष्पा हिरे उपस्थित होते. प्रास्तविक ललित बंब यांनी केले. पुष्पा हिरे, अहिरे पल्लवी, बाळासाहेब शेळके, सुभाष वाणी, पांडुरंग बड़गुजर, राजेंद्र हिरे यांनी भाषणे केली. 'झाडे लावा, झाडे जगवा' आदी घोषणा दिल्या. कार्यक्रमास मोहिनी शर्मा, मेघा वारे, ज्योती चौधरी, सोमनाथ जाधव, ललित बंब, लीना बंब, अजय देशमुख, चंद्रकांत निकम, सुनील गायकवाड उपस्थित होते. लीना बंब यांनी यांनी आभार मानले.

हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानात वृक्षारोपण

नाशिक । हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान येथे जागतिक वसुंधरा दिनानिमित्त मैदानावर मोरया जॉगर्स ग्रुप व मित्र परिवारातर्फे शाहू खैरे, प्रशांत कुमावत यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी जॉगर्स क्लबचे सर्व सदस्य व जॉगर्सप्रेमी उपस्थित होते.

सीबीएसई वाचन आव्हान स्पर्धेत शिंदेचे यश

नाशिक । सीबीएसई वाचन आव्हान स्पर्धेत आर्मी पब्लिक स्कूल देवळालीचा सातवीतील विद्यार्थी शौर्य शिंदे पाटीलने अंतिम फेरीत प्रवेश मिळवणाऱ्या देशभरातील टॉप ४२ विद्यार्थ्यांमध्ये स्थान मिळवले. सीबीएसई वाचन आव्हान हा विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय लावण्यासाठी सीबीएसईने सुरू केलेला एक उपक्रम आहे. देशभरातील सुमारे पंचवीसहून अधिक शाळांनी या स्पर्धेत भाग घेतला. सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी हे आव्हान दोन फेऱ्यांमध्ये आयोजित करण्यात आले होते. यात शिंदेने बाजी मारली. याबद्दल शिंदेचे मुख्याध्यापकांसह शिक्षकांकडून अभिनंदन होत आहे.

वृद्धाश्रमात आरोग्य शिबिर

नाशिक । पंचवटी येथील वात्सल्य वृद्धाश्रमात नुकतेच अनामया होमिओकेअरच्या संचालिका डॉ.सायली लोळगे यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. वृद्धाश्रमातील आजी-आजोबांच्या आरोग्याची तपासणी करून विविध आजारावर त्यांना होमिओपॅथी औषधी देण्यात आल्या. याप्रसंगी डॉ. सायली यांचे वडील संजय लोळगे उपस्थित होते. वृद्धाश्रम संचालक सतीश सोनार यांनी आभार मानले.

हंसिकाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

नाशिक । मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मंत्रालय, मुंबई येथे गर्ल्स सर्व्हिसेस प्रिपरेटरी इन्स्टिट्यूट, नाशिक येथील विद्यार्थिनी हंसिका मोहन टिल्लू हिचा राष्ट्रीय संरक्षण अकादमीची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करून देशात ३९ वा तर मुलींमध्ये ५ वा क्रमांक पटकावल्याबद्दल सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर

नाशिकरोड । दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा महिला कार्यकारिणीच्या वतीने कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर महाकर्मभूमी बुद्धविहार नाशिकरोड येथे आयोजित करण्यात आले होते. शिबिरास प्रमुख अतिथी म्हणून भारती शिराळ, वैशाली आहिरे यांची उपस्थिती लाभली. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरेखा लोखंडे होत्या. सूत्रसंचालन मंगला वाघमारे, मीना साळवे यांनी केले. कार्यक्रमाप्रसंगी कविता बोर्डे, वंदना वाहुळे, सविता पवार, वैशाली आठवले, सरिता जगताप, रेखा दिवे, अलका दोंदे, वनिता मोरे, छाया सुरवाडे, वर्षा वनिस, सुशिला जाधव, कमल लोखंडे, माधुरी निकाळे, वंदना निकम, वंदना गायकवाड आदी उपस्थित होते.

काश्मीरमध्ये नरसंहार

(पान १ वरून) श्रीनगरला रवाना झाले.तेथे त्यांनी सुरक्षेसंदर्भात उच्चस्तरीय बैठक घेतली. आज ते पहलगाम येथे जाणार आहेत. तत्पूर्वी त्यांनी आयबी आणि रॉ प्रमुखांची बैठक घेऊन योग्य त्या सूचना दिल्या. या हल्ल्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील गृहमंत्री अमित शहा यांच्याशी फोनवर चर्चा केली असून, कठोर कारवाईचे निर्देश दिले. या हल्ल्यादरम्यानचे काही व्हिडिओदेखील समोर आले आहेत. यात, ठिकठिकाणी जखमी लोक रडताना आणि आक्रोश करताना दिसत आहेत. एका व्हिडिओमध्ये, एक पीडित महिला रडत रडत सांगत आहे की, आम्ही भेळपुरी खात होतो, तेव्हा बाजूने दोन लोक आले आणि त्यापैकी एक जण म्हणाला, हा मुस्लीम दिसत नाही, घाला गोळी आणि त्यांनी माझ्या पतीला गोळी घातली.

हिंदी विषयाची सक्ती मागे

(पान १ वरून) पक्षांनी तसेच शिक्षण तज्ज्ञांनी विरोध केला होत. या पार्श्वभूमीवर आता हिंदी भाषा हा विषय अनिवार्य न ठेवता तो ऐच्छिक असेल. त्यामुळे तिसरी भाषा विद्यार्थी कोणती निवडतात ते बघून सुधारित शासन निर्णय काढला जाईल, असे भुसे यांनी यावेळी स्पष्ट केले. हिंदी भाषा विषयाच्या संदर्भातील निर्णय केंद्र सरकारकडून थोपविला गेला नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्येच त्रिभाषा सूत्र हे कायम राहील असे स्पष्ट केले आहे. राष्ट्रीय एकात्मता टिकवण्यासाठी हे सूत्र आहे. तीन भाषांची निवड राज्य सरकार आणि विद्यार्थ्यांनी करायची आहे. या तीन भाषांपैकी पैकी २ भाषा या भारतीय भाषा असल्या पाहिजेत, असे शिक्षण धोरणात नमूद असल्याचे दादाजी भुसे यांनी सांगितले. राज्यात ९ सप्टेंबर २०२४ रोजी राज्य सुकाणू समितीच्या बैठकीत तृतीय भाषा म्हणून हिंदीचा समावेश करण्याचा निर्णय झाला. मराठी आणि इंग्रजी भाषा अनिवार्य आहेत. मराठी आणि हिंदी भाषेची लिपी ही देवनागरी आहे. त्यामुळे तिसरी भाषा म्हणून हिंदी स्वीकारली तर ती आपल्या विद्यार्थ्यांना शिकायला सोपे जाईल. शिवाय शिक्षकांनाही हा विषय शिकवणे सोपे जाईल. यासाठी हिंदीचा निर्णय घेण्यात आला होता, असा खुलासा भुसे यांनी केला.

मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा

(पान १ वरून) शुल्कात अनुदान मिळणार आहे. मत्स्य शेतकरी, मत्स्य संवर्धन प्रकल्प, संबंधित कारखाने, प्रक्रिया युनिट यांना कृषी दराने वीज मिळणार आहे. मत्स्य शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड, बँकांकडून कृषी दराने कर्ज सुविधा इत्यादी आणि कृषीनुसार अल्पदराने विमा संरक्षणाचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे. परिणामी ग्रामीण भागात रोजगार निर्मितीलाही चालना मिळणार असून मत्स्य उत्पादनात मोठी वाढ होणार असल्याचा विश्वास राणे यांनी यावेळी व्यक्त केला.

नायगावला सावित्रीबाई फुले स्मारकासाठी १४२ कोटी

(पान १ वरून) या परिसरातील महिलांसाठी सबलीकरणासाठी मार्गदर्शक ठरणार आहे. महिला प्रशिक्षण केंद्राचे दीर्घकालीन व्यवस्थापन, प्रशासन, तसेच प्रशिक्षण कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, सातारा यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत जिल्हा परिषद, पोलीस प्रशासन, यशदा, कौशल्य विकास विभाग तसेच ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे प्रतिनिधी यांचा समावेश राहणार आहे.

यूपीएससीत शक्ती दुबे अव्वल

(पान १ वरून) ५५ उमेदवारांना भारतीय परराष्ट्र सेवेत नियुक्त करण्यात आले आहे आणि १४७ जणांना भारतीय पोलीस सेवेत निवडण्यात आले आहे. एकूण १,००९ उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आली आहे, ज्यामध्ये सामान्य श्रेणीतील ३३५, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील १०९, इतर मागासवर्गीय ३१८, अनुसूचित जाती १६० आणि अनुसूचित जमाती श्रेणीतील ८७ उमेदवारांचा समावेश आहे. याशिवाय, केंद्रीय सेवा गट 'अ' साठी ६०५ उमेदवारांची तर गट 'ब' सेवांसाठी १४२ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी एकूण ९,९२,५९९ उमेदवारांनी अर्ज केला होता, त्यापैकी ५,८३,२१३ उमेदवार प्रत्यक्षात परीक्षेत बसले होते. एकूण १४,६२७ उमेदवार सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या लेखी (मुख्य) परीक्षेत सहभागी होण्यासाठी पात्र ठरले. यापैकी २,८४५ उमेदवार परीक्षेच्या व्यक्तिमत्व चाचणीसाठी पात्र ठरले.

महाराष्ट्रातील यशस्वी उमेदवार

अर्चिति डोंगरे (०३) शिवांश जगदाळे (२६) शिवानी पांचाळ (५३) अदिती चौघुले (६३) साई जाधव (६८) विवेक शिंदे (९३) तेजस्वी देशपांडे (९९) दिपाली मेहतो (१०५) ऐश्वर्या जाधव (१६१) शिल्पा चौहान (१८८) कृष्णा पाटील (१९७) गौरव कायंदे पाटील (२५०) मोक्ष राणावत (२५१)प्रणव कुलकर्णी (२५६) अंकित जाधव (२८०) आकांश धुळ (२९५) जयकुमार आडे (३००) अंकिता पाटील (३०३) पुष्पराज खोत (३०४) राजत पात्रे (३०५) पंकज पाटले (३२९) स्वामी रामलिंग (३३६)अजय डोके (३६४) श्रीरंग कावोरे (३९६) वद्यवत नाईक (४३२) मानसी साकोरे (४५४) केतन इंगोले (४५८) बच्छाव कार्तिक रवींद्र (४६९) अमन पटेल (४७०) संकेत शिंगाटे (४७९) राहुल आत्राम (४८१) चौधर रामदास (४८७) बावणे सर्वेश (५०३) आयुष कोकाटे (५१३) बुलकुंडे सावी (५१७) पांडुरंग एस कांबळी (५२९) ऋषिकेश नागनाथ वीर (५५६) श्रुती संतोष चव्हाण (५७३) रोहन राजेंद्र पिंगळे (५८१) अश्विनी संजय धामणकर (५८२) अबुसलीया खान कुलकर्णी (५८८) सय्यद मोहम्मद आरिफ मोईन (५९४)वेदांत माधवराव पाटील (६०१) अक्षय विलास पवार (६०४) दिलीपकुमार कृष्ण देसाई (६०५) गायकवाड ऋषिकेश राजेंद्र (६१०) स्वप्नील बागल (६२०) सुशील गिट्टे (६२३) सौरव राजेंद्र ढाकणे (६२८) अपूर्व अमृत बलपांडे (६४९) कपिल लक्ष्मण नलावडे (६६२) सौरभ येवले (६६९) नम्रता अनिल ठाकरे (६७१) ओंकार राजेंद्र खुंताळे (६७३) यश कनवत (६७६) बोधे नितीन अंबादास (६७७) ओमप्रसाद अजय कंधारे (६७९) प्रांजली खांडेकर (६८३) सचिन गुणवंतराव बिसेन (६८८) प्रियंका राठोड (६९६) अक्षय संभाजी मुंडे (६९९)अभय देशमुख (७०४) ज्ञानेश्वर बबनराव मुखेरकर (७०७) विशाल महार (७१४) अतुल अनिल राजुरकर (७२७) अभिजित सहादेव आहेर (७३४) भाग्यश्री राजेश नायकेले (७३७) श्रीतेश भूपेंद्र पटेल (७४६) शिवांग अनिल तिवारी (७५२) पुष्कर लक्ष्मण घोळावे (७९२) योगेश ललित पाटील (८११) श्रुष्टी सुरेश कुल्ये (८३१) संपदा धर्मराज वांगे (८३९) मोहिनी प्रल्हाद खंदारे (८४४) सोनिया जागरवार (८४९) अजय नामदेव सरवदे (८५८) राजू नामदेव वाघ (८७१) अभिजय पगारे (८८६) हेमराज हिंदुराव पनोरेकर (९२२) प्रथमेश सुंदर बोर्डे (९२६)गार्गी लोंढे (९३९) सुमेध मिलिंद जाधव (९४२) आनंद राजेश सदावर्ती (९४५) जगदीश प्रसाद खोकर (९५८) विशाखा कदम (९६२) सचिन देवराम लांडे (९६४) आदित्य अनिल बामणे (१००४)

शब्दकोडे : ०३८



आडवे शब्द : १) महाराष्ट्राचा मंगल कलश आणणारे पहिले मुख्यमंत्री. ५) २००९ सालचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळविणारी ज्येष्ठ अभिनेत्री. ७) भरपूर. ९) बंधनातून सुटलेला. १०) खोटा, तात्पुरता राग, प्रेम इ. १३) बारा वर्षांचा काळ. १४) राणीचा ** मुंबईतील एका उद्यानाचे पूर्वीचे नाव. १५) महाबळेश्वर, प्रतापगड, सज्जनगड, कोयना धरण असलेला कर्मवीरांचा जिल्हा. १६) आणि. १७) १९९५ सालचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळविणारी स्वरसम्राज्ञी. १९) मेघ, जलद. २०) आवाज, गोंगाट. २१) स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव. २३) राष्ट्र. २४) शिवसृष्टीची कल्पना साकारणारे कोंकणातील गाव. २७) जहाचांचे स्थानक, माकड (हिं.). २८) प्रहार, घाव. २९) अथवा, किंवा. ३०) गावाखालची जमीन. ३२) पडलेला. ३४) म. गांधीजी यांचा एक आश्रम असलेले नागपूर जवळचे गाव. ३५) विचार करण्यासाठी बैठक. ३६) महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळालेला, क्रिकेटमध्ये प्रतम दहा हजार धावांचा पल्ला ओलांडणारा क्रिकेटवीर. ४०) हवामानाचा अभ्यास करणारी संस्था. ४३) कपर्दिका, नखावरील पांढरा डाग. ४४) कदम एक दिवंगत संगीतकार. ४५) ** गंधाधर टिळक. ४६) फुला-फळांचे शेत. ४८) महाराष्ट्राजवळचे छोटे निसर्गरम्य राज्य. ५०) दही घुसळून पातळ केलेले पेय, तक्र. ५१) च्या बरोबर. ५२) २००६ सालाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळविणारे उद्योगपती. ५५) शकराचे एक नाव '' गोविंद रानेड'' एक समाज सुधारक. ५७) थंड, शीतल. ५८) छोटा डोंगर. ५९) मोहन धारिया यांच्या वनसंवर्धन कारणाऱ्या संस्थेचे नाव. ६०) मार्ग, रस्ता.

उभे शब्द : १) महाराष्ट्र राज्याचे पहिले राजकवी. २) नमस्कार. ३) २००३ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळविणारे जायापती (दांपत्य.). ४) हालचाल. ५) उलटच्या विरुद्ध. ६) ओरखडा. ८) महाराष्ट्र भूषण या पुरस्काराचे पहिले मानकरी. ११) तळे, सरोवर, बांगड्याचा व्यवसाय करणारी जमात. १२) पराजय. १८) २००८ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळविणारे कवी. २०) वाळवंट, युद्ध. २१) भूदान, ग्रामदान चळवळीचे प्रणेते, गीताई लिहिणारे संत. २२) रेशीमाचे धोतर. २५) जाडसर पीठ. २६) वरपांगी, दिखाऊ. ३१) सत्व. ३२) हिंदीत पापणी. ३३) यात्रेकरू. ३६) मोठा दात. ३७) कमरे भोवतीचा धागा. ३८) २००२ सालाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळविणारे थोर गायक. ३९) २००४ सालचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळविणारे थोर समाजसेवक. ४१) हिंमत, धैर्य. ४२) विद्यालय. ४७) सेवटचा पांडव. ४९) चर्चा. ५०) तराजूची एक बाजू. ५१) षट. ५३) सरकारने शेतकऱ्यांना मदतीसाठी दिलेले कर्ज. ५४) पुरुष. ५) झकास, छान. ५६) अरण्य.

शब्दकोड२५९चे उत्तर